सकाळ » TODAY

गुरुवार, १९ सप्टेंबर २०१९ / ६



पेठ : नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला.

# इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरची महाडिक अभियांत्रिकीमध्ये स्थापना

## पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशनशी सामंजस्य करार

इस्लामपूर, ता. १८ : नानासाहेब महाडिक अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना विदेशी विद्यापीठात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरची स्थापना करण्यात आल्याची माहिती श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव राहुल महाडिक यांनी दिली.

इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरसाठी नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा. महेश बी. जोशी म्हणाले की, ''इंटरनॅशनल आऊटरिच सेंटरच्या माध्यमातून अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचा ठसा उमटवण्याची संधी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिली आहे.'' प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी म्हणाले, ''या आऊटरिच सेंटर अंतर्गत विद्यार्थ्यांना फॉरेन युनिव्हर्सिटी कशी निवडावी, त्याकरिता कोणती परीक्षा देणे आवश्यक आहे, परदेशी शिक्षणासाठी उपलब्ध शैक्षणिक कर्ज सुविधा, व्हीसा प्रक्रिया; तसेच युनिव्हर्सिटी व कोर्स शॉर्टलिस्टिंग याकरता मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या सेंटरद्वारे महाविद्यालयातील विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी दर आठवड्याला समुपदेशन करण्यात येणार आहे. यावेळी पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशन, कोल्हापूर यांचे तज्ज्ञ समुपदेशन करतील.'' प्रा. नीलेश साने, प्रा. अमोल पाटील, पाथ सीड्स ग्लोबल एज्युकेशनचे सलील राजगुरू, सानिका डोईफोडे उपस्थित होते.